ePaper

## राज्यात जोर'धार'! मुसळधार पावसाचा धुमाकूळ!



वर्ष - 7 । अंक -68 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 7 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- विश्रांतवाडीत "मान्सून शॉपिंग फेस्टिवल"
- शरद पवारांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

# विद्यार्थ्यांना दिलासा!

## उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी मुदतवाढ!: शालेश शिक्षण व क्रीडा विभागाचे निर्देश

### इयत्ता 11 वीच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**: 'महाऑनलाईन' पोर्टल वारंवार बंद आणि सर्व्हर डाऊनची समस्या असल्यामुळे हजारो अर्ज तहसीलदार कार्यालयाकडे पडून आहेत. त्यामुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विद्यार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला असून, नॉन क्रिमीलेअर व आर्थिकदृष्या दुर्बल घटक दाखल्यासाठी ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवडच्या तहसीलदार डॉ. अर्चना निकम यांनी दिली.**



सन-२०२३-२४ च्या अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी नॉन क्रिमीलेअर (उन्नत गटात मोडत नसल्याचा) दाखला सादर करु न शकल्यास त्यांच्याकडून हमी पत्र किंवा पोहोच पावती घेऊन प्रवेश द्यावा, असे आदेश शालेय शिक्षण विभागाने काढले आहेत. तसेच, १२ वी नंतरच्या प्रवेशासाठीही हमीपत्र देऊन कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत.

सेवा हमी कायदा अंतर्गत निगर्मित होणाऱ्या दाखल्यांना उशीर होत असल्याने आर्थिकदृष्या दुर्बल घटक दाखल्यासाठी ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. विभागांनी दाखले स्विकारण्यास १५ दिवसांची मुदतवाढ देण्याबाबतची सूचना प्रधान सचिव कार्यालयाने दि. ३० जून २०२३ रोजी दिली होती. त्यानुसार शिक्षण विभागाने शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयास कळवले होते.

### नागरिकांच्या अडचणींवर तोडगा काढण्याचा प्रयत्न...

सन २०२३-२४ च्या इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी EWS प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. तसेच, शासकीय सेवांचा उपयोग करणाऱ्या लाभार्थींची संख्या पूर्वीपेक्षा चार ते पाच पटींनी वाढली असल्याने त्याचा महाआयटीच्या सर्व्हरवर अतिरिक्त भार पडत आहे. यामुळे दाखला ऑनलाईन पद्धतीने निर्गमित होण्यास १५ ते २० मिनिट वेळ लागत आहे. सर्वसाधारणपणे दिवसभरात ५० ते ६० हजार दाखले निर्गमित होतात. परंतु, सध्यस्थितीमध्ये विविध विभागांत नागरिकांना शैक्षणिक प्रवेश, नोकर भरती इत्यादींसाठी दाखल्यांची तातडीने आवश्यकता आहे. परंतु, दाखले ऑनलाईन पद्धतीने निर्गमित करण्यास उशीर होत असल्याने नागरिकांची अडचण होत आहे. आता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने तीन महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांना दिलास मिळाला आहे.

# महापालिका अतिरिक्त आयुक्तपदी विजयकुमार खोराटे

## जितेंद्र वाघ यांची बदली : महापालिका वर्तुळात चर्चेला उधाण

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांची बदली झाली असून विजयकुमार खोराटे यांची त्यांच्या जागी अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

राज्यातील सत्ताधारी भाजपा-शिवसेना सोबत आता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी सहभाग घेतल्यानंतर महापालिका प्रशासकीय बदलांच्या हालचाली सुरू असल्याची बातमी 'महाईन्यूज' ने प्रसिद्ध केली होती. त्यानंतरच दुसऱ्याच दिवशी वाघ यांच्या बदलीनंतर या वृत्तावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे महापालिका वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

राज्य सरकारने 1 सप्टेंबर 2014 रोजी पिंपरी महापालिकेचा समावेश 'ब' वर्गामध्ये केला आहे. 'ब' वर्गात समावेश झाल्यामुळे महापालिकेचा नवा आकृतीबंध, सेवा प्रवेश व सेवांचे





वर्गीकरण नियम तयार केले होते. महापालिकेच्या आकृतिबंधाला राज्य सरकारने मंजूरी दिली आहे.

नवीन आकृतीबंधानुसार महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तवरचे आणि महापालिका अधिका-यांकरिता पदोन्नतीसाठी एक याप्रमाणे तीन पदे निर्माण करण्यात आली आहेत.

### जितेंद्र वाघ यांचा कार्यकाळ उल्लेखनीय...

जितेंद्र वाघ यांची 21 सप्टेंबर 2021 रोजी अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली होती. वाघ यांनी पावणे दोन वर्षांच्या कारकीर्दीत चांगले काम केले. शांत, संयमी, मितभाषी अधिकारी अशी त्यांची ओळख होती. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने वाघ यांची महापालिकेतील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणली आहे. त्यांची सेवा त्यांच्या मूळ महसूल व वन विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मुख्याधिकारी संवर्गातील विजयकुमार खोराटे यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश शासनाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी-छापवाले यांनी काढले आहेत.

# विश्रांतवाडीत "मान्सून शॉपिंग फेस्टिवल"

## ग्रीन अँपल एक्सहिबिशन आणि विजय मंगल प्रतिष्ठानचा पुढाकार

### ग्राहकांना सुवर्णसंधी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळा सुरू झाला की आपल्याला बऱ्याच गोष्टींची गरज लागते मग आपल्याला आठवते परंपरागत आपण वापरत असलेल्या वस्तु जसे की छत्री रेनकोट इत्यादि.परंतु काळ आता बदलला आहे. पावसाळ्यात दिवसभर खूप पाऊस पडत असतो. त्यामुळे संपूर्ण वातावरण अगदी थंड आणि आल्हादायक असते. आकाशात काळे ढग थैमान घालून असतात आणि ते सतत गर्जत असतात. या दिवसातील पाऊस सर्वानाच हवा हवासा असतो. प्रत्येकजण आपापल्या परीने पडणाऱ्या पहिल्या पावसाचा आनंद घेत असतात. यात केवळ बालकेच नव्हे तर अगदी वृध्द देखील आपला आनंद व्यक्त करण्यात कमी पडत नाहीत. अश्याच आल्हाददायक वातावरणाचे औचित्य साधत तसेच विश्रांतवाडी परिसरातील लोकांच्या दैनंदिन गरज लक्षात घेऊन 'मान्सून शॉपिंग फेस्टिवल' चे आयोजन करण्यात आले आहे.**



**विजय मंगल प्रतिष्ठानच्या सहयोगाने विश्रांतवाडी "मान्सून शॉपिंग फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. हा शॉपिंग फेस्टिव्हल ८ आणि ९ जुलै रोजी विश्रांतवाडी येथील, तिरुपती गार्डन मंगलकार्यालयात, सर्वांसाठी खुला राहणार आहे. विश्रांतवाडीकरांना मनसोक्त खरेदी करण्याची संधी उपलब्ध होत आहे. सकाळी ११ ते रात्री ९.३० पर्यंत हा फेस्टिव्हल सुरू राहील.**

या शॉपिंग फेस्टिवल साठी विजय मंगल प्रतिष्ठानचे विशेष सहकार्य मिळाले असून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत विजय मंगल प्रतिष्ठान हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तसेच व्यवसायावर असणाऱ्या कुटुंबांना आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचेही काम विजय मंगल प्रतिष्ठान करत आहे. आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचा या मागचा हेतू आहे.*

काय मिळेल फेस्टिवलमध्ये?

या "मान्सून शॉपिंग फेस्टिवल" मध्ये प्रामुख्याने बनारसी साड्या, चंदेरी साड्या, कांजीवरम, पैठणी, शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी




सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, खान्देशी केळीचे वेफर्स, शेंगदाणा गुळपट्टी, शोभेच्या वस्तू, सोलापुरी चादर, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, बेडशीट असे स्टॉल असणार आहेत. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात. या मध्ये स्टॉल हवा असल्यास ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा. या माध्यमातून नक्कीच आपल्या व्यवसायाला विश्रांतवासी परिसरातून चालना मिळेल. तसेच या फेस्टिवलच्या माध्यमातून व्यावसायिकांना विश्रंतवाडी परिसरात बिझिनेझ प्रोमोट करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आपणही आपला बिझनेस या लोकांपर्यंत या फेस्टिवलच्या माध्यमातून पोहचवू शकता.




# “प्रधानमंत्री आवास”साठी ‘डेडलाईन’!

## आ. महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक

**लाभार्थींना सदनिकांचा ताबा निर्धारित वेळत मिळणार!**

**आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून कालबद्ध नियोजनाचे आश्वासन**

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या सदनिकांचा ताबा संबंधित लाभार्थींना मिळवा. या करिता महापालिका प्रशासनाला ‘डेडलाईन’ देण्यात आली आहे. तत्पूर्वी, सर्व प्रलंबित कामे मार्गी लावावी, अशी सूचना महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे.**

“सर्वांसाठी घर” या संकल्पनेतून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “प्रधानमंत्री आवास योजना” देशभरात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. कोविड, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात राज्यातील आणि शहरातील बदललेली राजकीय समिकरणे यामुळे प्रकल्प रेंगळला होता. मात्र, शिंदे फडणवीस सरकारच्या काळात आमदार लांडगे यांनी या प्रकल्पासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे योजनेबाबत शहरवासीयांमध्ये नकारात्मक संदेश जात आहे. त्यामुळे भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी लाभार्थी आणि संबंधित विभागाचे अधिकारी यांची बैठक घेतली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह शहर अभियंता रामदास तांबे, सहायक आयुक्त अण्णा बोदाडे यांच्यासह लाभार्थींचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथे प्रकल्पाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. प्रशासनाने लाभार्थी निश्चित केले आहेत. त्यांचे कर्ज मंजूर झाले आहे. अनामत रक्कम लाभार्थींनी भरलेली आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळणे अपेक्षीत होते. मात्र, काही तांत्रिक अडचणी आणि काहीअंशी अपूर्ण कामामुळे सदनिकांचा ताबा दिला जात नाही. त्यामुळे लाभार्थींमध्ये प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजीचा सूर आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करावी आणि लाभार्थींना सदनिकांचा ताबा देण्यात यावा.



### बैठकीत झालेले निर्णय पुढीलप्रमाणे:

1- बोऱ्हाडेवाडी प्रकल्प: दि. 31 जुलै 2023 रोजी काम पूर्ण करुन लाभार्थ्यांना घरे ताब्यात देणे.
2- चऱ्होली प्रकल्प: योजनेतील 4 इमारतीचे काम लवकर पूर्ण करून दि. 31 ऑगस्ट 2023 रोजी काम पूर्ण करुन लाभार्थ्यांना घरे ताब्यात देणे. (इमारत क्रमांक-1,5,6,7)
3- इमारत क्रमांक 2 आणि 3 दि. 31 ऑक्टोबर 2023 पर्यंत काम पूर्ण करुन ताबा देणे.
4- क्रमांक 4 इमारतीचा 31डिसेंबर 2023 रोजी ताबा देणे.
5- दि. 11 जुलै 2023 रोजी सायंकाळी 4 वाजता बोऱ्हाडेवाडी येथे आणि सायंकाळी 5.30 वाजता चऱ्होली येथे आमदार महेश लांडगे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह पाहणी करणार आहेत.



> “ चऱ्होली आणि बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पाचे काम पाहणारे प्रधानमंत्री आवास योजनेचे संबंधित अधिकारी, लाथार्थींचे शिष्टमंडळ यांच्याशी बैठक झाली. त्यानुसार, गोरगरीब नागरिकांच्या हक्काच्या घरांचा ताबा निर्धारित वेळेत मिळावा आणि प्रशासनाबाबत नकारात्मक वातावरण निर्माण होवू नये, यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, अशी सूचना केली आहे. आयुक्त आणि प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, निर्धारित वेळेत सदनिकांचा ताबा संबंधित लाभार्थींना देण्यात येईल, अशी अपेक्षा आहे.
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# ‘बदला’ घेण्याचा कट पिंपरी-चिंचवड पोलिसांनी उधळला!

## किशोर आवारे हत्या प्रकरण : चिंचवड पोलिसांकडून पाच जणांना अटक

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जनसेवा विकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांची 12 मे रोजी हत्या झाली. या हत्येचा बदला घेण्यासाठी एका टोळीने कट रचला. मात्र हा कट पिंपरी-चिंचवड पोलिसांनी उधळून लावला. या कटातील पाच जणांना अटक करत सात पिस्टल आणि 21 जिवंत काडतुसे पोलिसांनी जप्त केली आहेत.**

जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांची 12 मे रोजी तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या आवारात भर दिवसा गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करत हत्या करण्यात आली. यातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्यातून अनेक खुलासे समोर आले. या हत्या प्रकरणाचा तपास पोलीस करत असतानाच या हत्येचा बदला घेण्याचा कट एक टोळी करीत होती.

दरोडा विरोधी पथकातील पोलीस अंमलदार आशिष बनकर आणि सुमित देवकर यांना मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद सोपान सांडभोर (वय 33, रा. तळेगाव दाभाडे), शरद मुरलीधर साळवी (वय 30, रा. काळेवाडी. मूळ रा. जालना) यांना 25 जून रोजी रात्री साव्वाथ वाजताच्या सुमारास तळेगाव दाभाडे एसटी स्टँड परीसरातून कारसह पोलिसांनी ताब्यात घेतले.



या दोघांकडून चार गावठी पिस्टल, 14 जीवंत काडतूसे जप्त करण्यात आली. याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याचा तपास दरोडा विरोधी पथक करीत होते. त्या तपासात पोलिसांनी अमित जयप्रकाश परदेशी (वय 31, रा. तळेगाव दाभाडे), मंगेश भीमराव मोरे (वय 30, रा. वडगाव मावळ), अनिल वसंत पवार (वय 39, रा. तळेगाव दाभाडे) यांना अटक केली.

अटक केलेल्या आरोपींनी त्यांचे साथीदार अक्षय उर्फ आर्ची विनोद चौधरी (वय 28, रा. तळेगाव दाभाडे), देवराज (रा. जळगाव जामोद, बुलढाणा) यांच्यासह मिळून किशोर आवारे यांच्या हत्येचा बदला घेण्याचा कट केला. आरोपींकडे केलेल्या तपासात पोलिसांनी सात पिस्टल आणि 21 जिवंत काडतुसे, कोयता, तलवार अशी हत्यारे जप्त केली आहेत.

### सर्व आरोपी पोलीस रेकॉर्डवरील

» अटक केलेले आणि त्यांचे दोन साथीदार आरोपी हे पोलीस रेकोर्डवरील आहेत. त्यांच्या विरोधात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे ग्रामीण, अहमदनगर येथील तळेगाव दाभाडे, कामशेत, कोपरगाव, चाकण, वडगाव पोलीस ठाण्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, जबरी चोरी, खंडणी, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमवून गाड्यांची तोडफोड करून जाळपोळ करणे, बेकायदेशीररीत्या अग्निशस्त्र बाळगणे असे 26 गुन्हे दाखल आहेत.

### टोळीवर मोकाची कारवाई

»प्रमोद सोपान सांडभोर हा टोळीप्रमुख आहे. अन्य आरोपी हे त्याच्या टोळीतील साथीदार आहेत. सर्व आरोपी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटीत गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा 1999 (मोका) नुसार कारवाई करण्यात आली आहे.

### सात महिन्यात 11 टोळ्यांवर मोका


» जानेवारी ते जुलै या कालावधीत पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 11 गुन्हेगारी टोळ्यांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कारवाई केली आहे. 11 टोळ्यांमध्ये 139 आरोपींवर ही कारवाई करण्यात आली आहे.




**सध्या २९ जणांच्या मंत्रिमंडळात मूळच्या भाजपचे सदस्य आठच. त्यापैकी १४ पदे तीन पक्षांत विभागली जाणार.. त्याच त्या वर्गात बसण्याचा कंटाळा अजितदादा पवार यांस अजून कसा आला नाही, हा प्रश्नच आहे. खरे तर 'ढ'तला 'ढ' विद्यार्थीसुद्धा एकाच वर्गात सतत बसायची वेळ आली की कंटाळतो. त्यात अजितदादा तर हुशार आणि तडफदार. तरीही पाच-पाच वेळा उपमुख्यमंत्रीपदाचा वर्ग ते गोड मानून घेतात, ही बाब तशी कौतुकास्पद म्हणायची. "समस्या सोडवायची असेल तर त्याच प्रतलावर असून चालत नाही; समस्येच्या वर जाता आले पाहिजे," असे आईन्स्टाईनसारखा तत्वज्ञ वैज्ञानिक म्हणत असे.**

# आशीर्वाद की शाप?





अजितदादांनी आईन्स्टाईन वाचलेला आहे किंवा काय, हे माहीत नाही आणि तसे ते माहीत करून घेणेही अवघड. पण तसा तो त्यांनी वाचला असता तर उपमुख्यमंत्रीपदाचा त्यांच्यावर पडलेला वेढा सोडवण्यास निश्चित मदत झाली असती. दोनदा पृथ्वीराज चव्हाण, मधे अत्यंत अल्पकाळ देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि आता एकनाथ शिंदे अशा अनेक मुख्यमंत्र्यांच्या हाताखाली अजितदादा उपमुख्यमंत्री राहिलेले आहेत. यातील चव्हाण आणि फडणवीस हे ज्ञान आणि प्रशासकीय कौशल्य या आघाडीवर अजितदादांपेक्षा सरस. पण तुलनेने अगदीच नवखे उद्धव ठाकरे वा आता एकनाथ शिंदे यांचे उपमुख्यमंत्री म्हणून राहणेही अजितदादांनी गोड मानून घेतलेले आहे. वास्तविक 'उपमुख्यमंत्री' या पदास कोणताही घटनात्मक अर्थ नाही. कायद्यानुसार हे पदच अस्तित्वात नाही, हे उत्तम प्रशासकीय ज्ञान असलेल्या अजितदादांस माहीत नसणे अशक्य. तरीही पाच-पाच वेळा त्यांनी ते पद आनंदाने स्वीकारले यात त्यांची आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची अपरिहार्यता आणि असहायता दिसून येते. या प्रसंगी तीवर भाष्य गरजेचे.

कारण अलीकडे राजकारणात झालेला सराईत पक्षबदलूंचा सुळसुळाट. सत्तेच्या आसऱ्याने राहावे, भरपूर माया करावी, राजकारणाशिवाय कोणतेही कौशल्य मिळवू नये आणि सत्ता गेली की ती ज्यांच्या हाती आहे त्यांच्या आश्रयास जावे अशी ही संस्कृती. तिचे पाईक छगन भुजबळ ते नारायण राणे यांप्रमाणे अनेक नेते सत्ताधारी पक्षात आढळतील. सध्या महाराष्ट्रात भाजप-एकनाथ शिंदे यांची शिवसेना-अजितदादांचा राष्ट्रवादी यांची सत्ता आहे. त्यातील किती मंत्री आपापल्या मूळ पक्षांचे सदस्य आहेत यावर नजर टाकली तरी हा पक्षबदलूंचा पथ किती राजमार्ग झालेला आहे, हे दिसेल. त्यात या सगळ्यास आणखी एक लबाड पैलू आहे. तो जाती-पातीच्या राजकारणाचा. त्यामुळे भुजबळांस मंत्रीपद अव्हेरले तर तो 'अन्य मागासांवर' (ओबीसी) अन्याय ठरतो आणि रामदास आठवले मंत्री झाले की समस्त दलितांस हायसे वाटते, हे कसे? इथे भुजबळ, आठवले ही केवळ उदाहरणे. आणखीही असे अनेक सापडतील. एका व्यक्तीस गडगंज माया करण्याची संधी दिली गेल्याने त्या व्यक्तीच्या समाजाने आनंद मानण्याचे कारण काय? प्रातिनिधिक एकास भरपेट जेवू घातल्याने त्याच्या समाजातील इतरांचे पोट भरते काय? या असल्या खुळचट आणि बनेल युक्तिवादांमुळे सराईत पक्षबदलूंचे चांगलेच फावते. आताही शिंदे मंत्रिमंडळात नव्याने वर्णी लागलेल्यांची नावे पाहा. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, मंत्रीपद यांना मिळतेच मिळते. यातून जसे त्यांचे कौशल्य दिसते तसेच त्यातून समाजाच्या व्यापक राजकीय बावळटपणाचेही दर्शन होते. उदाहरणार्थ शिंदे यांचे मंत्रिमंडळ. त्यात रविवारी अजितदादांच्या बरोबर आलेल्या राष्ट्रवादी जथ्यास देण्यात आलेली खाती ही भाजपच्या वाट्यातील आहेत, असा युक्तिवाद शिंदे गटाचे करतात. तो त्यांच्यापुरता योग्यच. पण तरीही त्यामुळे मंत्रिमंडळाची संख्याक्षमता घटतेच आणि त्यातून अन्यांच्या मंत्रीपदाच्या आशा कमी होतात. अर्थात शिंदे गटाकडे काही हिरेमाणके आहेत असे नाही. पण शिंदेंच्या चरणी पहिल्या दिवसापासून निष्ठा वाहूनही माजी शिवसैनिकांच्या तोंडचा घास अजितदादा गटाचे दांडगेश्वर काढून घेणार असतील, तर शिंदेंचे साथीदार नाराज होणे साहजिक. त्यापेक्षाही केविलवाणी अवस्था आहे भाजपची. हिंदूत्व, राष्ट्रवाद, नैतिकता इत्यादी बौद्धिकी खुराकावर पोसल्या गेलेल्या मूळ अनेक भाजपवासीयांची राजकीय कारकीर्द सत्तेच्या गावकुसाबाहेरच वाया जाताना दिसते. बिचारे काही तक्रार करीत नाहीत आणि सर्व काही मुकाट्याने सहन करतात. पण भाजपस अत्यंत जिव्हाळ्याच्या हिंदूवादी मुद्द्यांवर यथेच्छ तोंडसुख घेणारे अन्यपक्षीय नेते सत्ता आली की आपल्या पक्षात येतात आणि आपल्या डोक्यावर बसतात याच्या कितीही नाही म्हटले तरी त्या सर्वांस वेदना होत असणारच.

आताही २९ सदस्यीय महाराष्ट्र मंत्रिमंडळात शुद्ध भाजप मंत्र्यांची संख्या फक्त आठ इतकीच आहे. कायद्यानुसार राज्य मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ४३ मंत्री असू शकतात. म्हणजे जास्तीत जास्त आणखी १४ मंत्र्यांची भर शिंदे घालू शकतील. म्हणजे आता ही १४ पदे तीन पक्षांत वाटली जातील. याचा साधा अर्थ असा की राज्यातील सरकारचे कर्ते-करविते असूनही बहुसंख्य भाजपवासी सत्तापरिघाच्या बाहेरच राहणार, हे नक्की.

---

**आषाढ श्रावणात येणाऱ्या प्रत्येक सणाला विशेष असे महत्व आहे त्यात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन या सणाबरोबरच आषाढ महिन्यात साजरा केला जाणारा महत्वाचा सण म्हणजे बेंदूर शेतकरी बांधव हा सण मोठ्या आनंदात आणी उत्साहात साजरा करतात अन्नधान्य (शेती )पिकविण्यासाठी आपल्या धन्यासोबत रात्रंदिवस राबणाऱ्या कष्ट करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस बेंदराच्या दिवशी बैलांना पूर्णपणे आराम दिला जातो त्या दिवशी शेतीची कोणतीही कामे बैलांकडून केली जात नाहीत बैलांची छान सजवून पूजा केली जाते त्यांना गोड पुरणपोळीचा सुग्रास नैवेद्य दिला जातो.**

# जावली खोऱ्यातील बेंदूर सण...



विशेष

- संजय पवार, ऐरोली
+91-7021325851

जावलीकर बेंदूर सण साजरा करतात साधारणतः 40 ते 45 वर्षांपूर्वी गावात प्रत्येक घरामध्ये शेती स्वतः केली जायची त्यासाठी बैलांची आवश्यकता असलेमुळे गावात बैलांची संख्याही साधारणपणे 80 ते 85 असावी त्यावेळच्या बैल आणी त्यांचे धनी यांचं अतूट असे नाते होते, बैलांची खूप काळजी घ्यायचे पोटच्या मुलाप्रमाणे त्याला सांभाळायचे दिवसभरात बैलाला जेथे बांधले जाते त्या गोठ्यात त्याला त्याला वैरणपाणी, दाणा गोठा, खुराक, स्वछता याची पुरेपूर काळजी घेतली जायची बैलाचा मालक जर बाहेरगावी कोठे कामानिमित्त गेला असेल तर घरी बैलाला व्यवस्थित लक्ष ठेवण्यास सांगितले जाई. बैलाला आपला धनी दिसला नाही तर बैल गोठ्यात सतत इकडे तिकडे बघत असे. इतके मालकाचे बैलावर आणी बैलाचे आपल्या मालकावर प्रेम असे. अशा या बैलांसाठी व शेतकऱ्यांसाठी बेंदूर हा आनंदाचा सण, बेंदराच्या आदल्या दिवशी उंबराच्या मुळीचे चाहूर तयार केले जाते ते बेंदराच्या दिवशी औताला, बैलाच्या शिंगाना बांधले जाते तसेच शेतात बैलाच्या मानेवर वर्षभर शेतीचा भार असतो त्याला एक दिवस विश्रांती मिळते त्याच्या मानेला हळद तूप लावून चोळले जाते याला खांदामळणी म्हणतात दुसऱ्या दिवशी स्वच्छ गरम पाण्याने अंघोळ घातली जाते शिंगे रंगीविली जातात, कपाळाला बाशिंग बांधले जाते, पाठीवर नक्षी असलेल्या चमकदार झुली चढविल्या जातात, गळ्यात कवडयाच्या आणी घुंगराच्या माळा घालतात अंगावर ठिपके उठविले जातात, नवी वेसण, नवा कासरा असा सगळा साज करून बैलांची मिरवणूक काढली जाते मारुतीच्या मंदिरासमोर सांयकाळी पाच वाजता सगळे बैल आले की एकामागोमाग एक एक जोडी उभी करून वाद्याच्या तालात वडाच्या मारुतीला प्रदक्षिणा घालून मालदेवला वळसा घालून हुड्यावरून खाली वेताळबाबाला प्रदक्षिणा घालून पुढे पद्मावती देवी, लक्ष्मीआईच्या मंदिराला प्रदक्षिणा घालून ज्याच्या त्याच्या घरी आल्यावर बैलांचे पाय धुवून औक्षण करून पुरणपोळीचा नैवेद्य देऊन घरात प्रवेश दिला जायचा. जावली तालुक्यातील आलेवाडी गावाला देशी गायींची उत्तम पैदास केली जायची प्रत्येक घरात किमान एकतरी गाय असायची या सर्व गायी एकत्रच रानात चारावयास नेत असत. शिबराच्या डोंगरात गायरान राखून ठेवलं आहे ही शिबराची (डोंगर) जागा पवित्र भूमी असल्यामुळे इथला चारा आणी वारा खाऊन उत्तम खिलारी जातीची पैदास याच मातीने दिली



इतर जनावरांना प्रवेश बंदी असायची या सर्व गायींसाठी स्वतंत्र गुराखी नेमून त्यांची योग्य देखभाल केली जात. असे शेलार कुटुंबातील एक सदस्य प्रामाणिकपणे सेवा दयायचे तलवारीच्या आकारातील लांब टोकदार शिंगे, पांढरा रंग, मजबूत बांधा असलेल्या गायींची संख्या भरपूर प्रमाणात असलेमुळे खिलार गायी बैलांची पैदास मोठ्या प्रमाणात झाली गावात गायी पाळण्याकडे लोकांचा कल होता त्या पाठीमागे धार्मिक बरोबर आर्थिक गणित असायचे घरच्या घरीच खिलार जातीची पैदास झाल्यामुळे शेतीला बैल मिळू लागले अशा या बैलांचे आणी मालकाचे नाते घरातील सदस्यांसारखे असायचे बैल म्हातारा झाला तरी मरेपर्यंत त्याला सांभाळला जायचा आणी ज्या ठिकाणी राबला त्या शेतातच त्याची माती केली जायची .

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज-उद्धव एकत्र येणार!

## चर्चांना उधाण, शरद पवारांचं तीन शब्दात उत्तर, म्हणाले “चांगली गोष्ट आहे”

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही बंडखोरी होऊन पक्षात उभी फूट पडली. यानंतर बदललेली राजकीय परिस्थिती पाहता राज्यात काही ठिकाणी मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठी माणसासाठी आता तरी एकत्र यावं असे बॅनर लागलेले पाहायला मिळाले. विशेष म्हणजे गुरुवारी (६ जुलै) मनसेचे नेते आणि राज ठाकरेंचे विश्वासू अभिजीत पानसे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांकडे युतीचा प्रस्ताव घेऊन गेल्याची चर्चा रंगली. आता याबाबत दिल्लीत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना विचारणा करण्यात आली. त्यावर पवारांनी स्मित हास्य करत तीनच शब्दात आपली प्रतिक्रिया दिली.**



अजित पवारांच्या बंडखोरीनंतर आता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील अशी चर्चा आहे. याबाबत महाराष्ट्रात होर्डिंगही लागत आहेत, असं लक्षात आणून देत शरद पवारांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर शरद पवार स्मित हास्य करत म्हणाले, “चांगली गोष्ट आहे.”यावेळी शरद पवारांनी अजित पवारांनी उल्लेख केलेल्या २०१९ च्या आमदारांच्या सह्यांच्या पत्रावरही भाष्य केलं. शरद पवार म्हणाले, “एक गोष्ट खरी आहे की, २०१९ मध्ये काही लोकांनी त्यांच्या सह्यांचं एक पत्र दिलं होतं. त्यात पक्षाचं पुढील धोरण काय असावं, कुणाबरोबर युती करावी यावर चर्चा करण्याची गरज आहे, असं म्हटलं. त्यावर मी बैठक बोलावं असं म्हटलं होतं. मात्र, नंतर पुढे निवडणूक आली आणि त्यावर काहीही चर्चा झाली नाही.”

### “2024 मध्ये महाराष्ट्रातील सत्ता बदलेल”

“मला पूर्ण विश्वास आहे की, २०२४ मध्ये महाराष्ट्रातील सत्ता बदलेल. आज जे सत्तेत आहेत त्यांना लोक दूर करतील. राज्यातील विरोधी पक्षांविरोधात ज्या प्रकारच्या गोष्टी करण्यात आल्या त्याची किंमत त्यांना मोजावी लागेल,” असं मत शरद पवार यांनी व्यक्त केलं.

### “त्यांना याची मोठी किंमत मोजावी लागेल”

“जे महाराष्ट्रात सुरू आहे त्याबाबत मला आनंद आहे की, याची मोठी किंमत मतदारांना आश्वासन देऊन चुकीच्या मार्गावर गेलेल्यांना मोजावी लागेल. राज्यातील सत्तेत बदल होतील आणि जनता राष्ट्रवादी, काँग्रेस व उद्धव ठाकरेंची शिवसेना यांच्या हातात सत्ता देतील,” असंही शरद पवारांनी नमूद केलं.

---

# आदिती तटकरे रायगडच्या पालकमंत्रीपदी नको!

।अलिबाग ।

राज्यातील सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रवेश झाल्यानंतर रायगडमधील राजकारण ढवळून निघायला सुरुवात झाली आहे. पालकमंत्री पदावरून रायगड जिल्ह्यात संघर्षाची पहिली ठिणगी पडली आहे. कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे यांना रायगडचे पालकमंत्रीपद देण्यास जिल्ह्यातून विरोध होत आहे. जिल्ह्यातील शिवसेना भाजपच्या सर्व आमदारांनी आदिती यांना पालकमंत्री करण्यास विरोध दर्शवला असल्याचे आमदार भरत गोगावले यांनी गुरुवारी सांगितले. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून एक गट शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील झाला. पहिल्याच फटक्यात ज्या नऊ आमदारांनी शपथ घेतली त्यात श्रीवर्धनच्या आमदार आदिती तटकरे यांचाही समावेश आहे. त्यानंतर आता तटकरे यांच्याकडेच रायगडचे पालकमंत्री पद येणार अशी चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे रायगडमधील शिवसेना-भाजपच्या आमदारांमध्ये अस्वस्थता आहे. आदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद देण्यास रायगड जिल्ह्यातील शिवसेना-भाजपच्या सर्व सहा आमदारांनी विरोध केला असल्याची माहिती आमदार गोगावले यांनी दिली. “पूर्वी आम्ही सत्तेत शिवसेना आणि भाजप असे दोनच पक्ष होतो. मंत्रीपदाच्या शर्यतीत असूनही मी थांबलो. त्याचवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून पालकमंत्रीपद शिवसेनेला देण्याचे निश्चित केले होते.

### विरोध का?

महाविकास आघाडी सरकार असताना रायगड जिल्ह्यातील उठावाला आदिती तटकरे यांचे पालकमंत्रीपद कारणीभूत ठरले होते. तटकरे जिल्हा नियोजनाचा निधी देत नाहीत, मानसन्मान देत नाहीत. आमदारांच्या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात असे आक्षेप शिवसेनेच्या तिन्ही आमदारांनी घेतले होते.

त्यामुळे तटकरे यांच्या विरोधात मोहीमही राबवण्यात आली होती. मात्र तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळेच शिवसेनेच्या तिन्ही आमदारांनी उठाव करत शिंदे गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष मीच!

## नेतृत्व करण्यास अजूनही खंबीर;शरद पवार यांचे प्रतिपादन

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“मी ८२ वर्षांचा असो वा ९२. मी अजूनही खंबीर असून, आता मी अधिक प्रभावीपणे काम करेन”, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बंडखोर गटाचे प्रमुख आणि पुतणे अजित पवार यांना गुरुवारी ठणकावले. “राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मीच राष्ट्रीय अध्यक्ष असून, इतरांच्या दाव्याला फारसे महत्त्व देण्याची गरज नाही. पक्ष फोडणाऱ्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल”, असा इशाराही पवार यांनी दिला.**

राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर बुधवारी मुंबईत झालेल्या बंडखोर पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात अजित पवार यांनी “तुम्ही ८२ वर्षांचे झालात, आता कधी थांबणार”, असा सवाल पवार यांना केला होता. त्याचा संदर्भ देत पवार यांनी गुरुवारी बंडखोरांना लक्ष्य केले. “ही राजकीय लढाई असून, लोकांमध्ये जाऊन आम्ही आमचे म्हणणे मांडू. कोणाकडे किती संख्याबळ आहे हे केंद्रीय निवडणूक आयोग ठरवेल. पण, महाराष्ट्रातील जनता माझ्याबरोबर आहे, हे मला माहिती आहे. लोकांचा आम्हाला पाठिंबा आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्रातील जनता महाविकास आघाडीला सत्तेवर बसवेल”, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर दिल्लीत गुरुवारी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये अजित पवार यांच्यासह शिंदे सरकारमध्ये मंत्रीपदाची शपथ घेणारे ९ नेते तसेच, लोकसभा व राज्यसभेतील खासदार प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. या बैठकीत ८ ठराव मंजूर करण्यात आले. ८ सदस्य वगळता अन्य १८ सदस्य उपस्थित होते. त्यांनी शरद पवारांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आणि निर्णयाचे सर्वाधिकारही त्यांना दिला. पक्षाच्या वैचारिक भूमिकेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा आम्हाला अधिकार आहे, असेही पवार म्हणाले. केंद्रीय निवडणूक आयोगाला अजित पवार गटाने दिलेल्या पत्रामध्ये शरद पवारांची राष्ट्रीय अध्यक्षपदावरून हकालपट्टी केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यावर बोलताना पवार यांनी, कोणाच्याही दाव्याला फारसे महत्त्व देण्याची गरज नाही, असा टोला बंडखोरांना लगावला.



### ‘आयोगावर विश्वास’

**अजित पवारांच्या गटाने मूळ पक्ष व निवडणूक चिन्हावर दावा केला असला तरी, राजकीय पक्ष कोणाच्या बाजूने आहे हे महत्त्वाचे आहे. राजकीय पक्षाला अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. आम्हाला केंद्रीय निवडणूक आयोगात लढाई लढावी लागेल. आयोगावर आमचा विश्वास आहे. त्यामुळे न्यायालयात जाण्याची वेळ येणार नाही, असे पवार म्हणाले.**

### ‘एजन्सी’ इतक्या प्रभावी माहीत नव्हते!

**अजित पवार बंड करत असल्याचे तुम्हाला कळले नव्हते का, या प्रश्नावर पवार यांनी, दिल्लीतील ‘एजन्सी’ इतक्या प्रभावी असतील याची माहिती नव्हती, अशी उपहासात्मक टिप्पणी करीत केंद्रातील भाजप सरकारला अप्रत्यक्ष टोला लगावला. केंद्रातील सरकार ईडी, सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत आहे. लोकसभा निवडणुकीला दहा महिने उरले असून, त्यानंतर आम्ही या यंत्रणाच्या कारभारामध्ये सुधारणा करण्याचा विचार करू, असे सांगत पवारांनी विरोधकांची महाआघाडी भाजपचा परभव करेल असा अप्रत्यक्ष दावा केला.**



प्रासंगिक


- डॉ. व्यंकटराव घोरपडे,
सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, सांगली.

**बैलगाडी शर्यत बंदी आणि न्यायालयीन प्रक्रिया सरते शेवटी दि.१८ मे २०२३ रोजी संपली. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधिशांच्या खंडपीठाने हा एकमताने दिलेला निकाल आहे.गेली जवळजवळ १२ वर्षे चाललेली ही न्यायालयीन प्रक्रिया संपुष्टात आल्याने राज्यात एकप्रकारची आनंदाची लहर उमटली. अनेक पशुपालक, शर्यत प्रेमी,बैलगाडा मालक-चालक संघटना यांना आनंद झाला. सोबत अनेक लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था, संबंधित न्यायालयीन बाजू मांडणारे वकील मंडळी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व प्रक्रियेत कळीचा मुद्दा ठरलेल्या 'बैलांची पळण्याची क्षमता' (RUNNING ABILITY OF BULLS) हा अहवाल तयार करणा-या पशुसंवर्धन विभागातील व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील अधिकारी व प्राध्यापक यांना देखील विशेष आनंद नक्कीच झालेला असणार आहे.**

# बैलगाडी शर्यतबंदी : बारा वर्षांचा इतिहास आणि साक्षीदार

जवळजवळ एक तपाची न्यायालयीन लढाई या पाठीमागे आहे. जुलै २०११ ते मे २०२३ या कालावधीत ही न्यायालयीन प्रक्रिया अंतिम निकालापर्यंत पोहचली. मध्यंतरी १० नोव्हेंबर २०१७ मध्ये महाराष्ट्र सरकारने प्राणी क्लेश प्रतिबंधक अधिनियम १९६० अंतर्गत सुधारणा करून नवीन नियमावलीची अधिसूचना जाहीर केली. त्यानुसार 'एक देश एक शर्यत' या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली होती. ती कायम ठेवत त्यास मान्यता दिली. अट एकच की बैलांना क्रूरतेने वागवता कामा नये.

सन १९६० च्या प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्यातील कलम २२(२) नुसार ज्या प्राण्यांचा माणसाकडून छळ होतो त्या प्राण्यांच्या संरक्षणासाठी त्याचा गॅझेट मध्ये समावेश करण्याबाबत वन व पर्यावरण मंत्रालयाला अधिसूचित करण्यात आले. सदर मंत्रालयाने २०११ मध्ये सुरुवातीपासून असलेल्या चित्ता, वाघ, सिंह, अस्वल, माकड यांच्यासोबत बैलांचा देखील समावेश केला. एवढ्या एकाच कारणावरून व बैलगाडी मालक-चालकांनी काही गोष्टीकडे कानाडोळा केला होता त्यामुळे संबंधित प्राणी प्रेमी संघटनांनी लक्ष वेधून, कायद्याचा आधार घेऊन बंदीसाठी प्रयत्न केले व बंदी घातली गेली. त्यावेळी महाराष्ट्रासह पंजाब, कर्नाटक, तामिळनाडू राज्यांनी सुद्धा विरोध केला. महाराष्ट्रात देखील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, बैलगाडी शर्यत प्रेमी, बैलगाडा चालक-मालक संघटना यांनी आंदोलने, मोर्चे व निवेदन सादर करून शासनावर दबाव आणला. सोबत बैलगाडी शर्यतीचे अर्थकारण, देशी गोवंश टिकवणे, संस्कृती रक्षण अशा अनेक मुद्द्याचा उहापोह केला. परिणामी २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करून २०१७ मध्ये राज्यात बैलगाडी शर्यतीना परवानगी दिली होती. प्राणी प्रेमी, बैलगाडी चालक-मालक संघटना यांनीही स्वतंत्रपणे न्यायालयीन लढा दिला होता. तथापि प्राणी प्रेमी संघटनांनी याला विरोध करून उच्च न्यायालयात दाद मागितली. या कायद्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली व मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर स्थगिती कायम ठेवली. पुढे २०१८ मध्ये महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले व ते नंतर पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे वर्ग करण्यात आले.






मध्यंतरी ७ मे २०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने बैलांचा संरक्षित प्राण्याच्या यादीतील समावेश आणि बैल हा पळणारा प्राणी नाही, त्याचे पोट हे बॅरेलच्या आकाराच्या आहे, शेती कामासाठी त्याचा वापर होतो, नांगरणी वाहतूक व शेती उद्देशासाठी त्याचा वापर होतो, त्यांना वेदना व त्रास देऊन शर्यतीत उतरवले जाते, बैलांना एक खूर असतो व घोड्याला दोन खूर असतात अशी अनेक कारणे देऊन बंदी घातली होती.

७ जानेवारी २०१६ रोजी केंद्र शासनाने एका अधिसूचनेद्वारे काही अटी व शर्ती घालून बैलगाडी शर्यतीना परवानगी दिली होती. पण त्या सुद्धा अधिसूचनेस आव्हान दिल्यामुळे केंद्र शासनाने ही अधिसूचना मागे घेतली. ६ एप्रिल २०१७ मध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्यात बदल करून परवानगी दिली व मा. राष्ट्रपतींनी देखील १५ जुलै २०१७ रोजी भारतीय घटना कलम २०१ मधील तरतुदीनुसार संमती दिली होती. पुढे एका जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने निकाल देताना सुप्रीम कोर्टाच्या निरीक्षणाला अनुसरून दिलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्यावेळी मात्र महाराष्ट्र शासनाने पशुवैद्यक तज्ञांची एक समिती नेमून बैलाची शरीर रचना व पळण्याची क्षमता याबाबत अहवाल तयार करावयाचे ठरवले व त्यानुसार पशुवैद्यक क्षेत्रातील वेगवेगळ्या विषय तज्ञांची एक तांत्रिक समिती दि.२/११/१७ च्या शासन निर्णयानुसार गठीत केली. घोडा व बैल यांची शरीर रचना, पळण्याची क्षमता, काम करण्याची क्षमता, पळताना होणारे शरीरातील बदल याचा अभ्यास करून निर्णय घेण्याची जबाबदारी समितीवर सोपवली. देशांतर्गत व देशाबाहेरील या विषयातील तज्ञांचे मत जाणून घेऊन राज्यातील अनेक जिल्ह्यातील पशुपालक, शर्यत प्रेमी बैलगाडी मालक-चालक, यांच्याशी थेट संवाद साधून हा अहवाल तांत्रिक तज्ञ समितीने तयार केला. तांत्रिक तज्ञ समितीमध्ये पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील प्राध्यापक यांचा समावेश होता. त्यांनी सादर केलेला हा अहवालच या सर्व प्रक्रियेत 'गेम चेंजर' ठरला.

## एक आदर्श संपूर्ण देशासमोर ठेवला जाईल

» या महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या तांत्रिक तज्ञ समितीमध्ये डॉ. डी. एम. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. राजीव गायकवाड, डॉ. अनिल उलेमाले, डॉ. एस. डी. इंगोले, डॉ. संजय बानूबकोडे, डॉ. विश्वंभर पाटोदकर, डॉ. संजय लंबाटे, डॉ. समीर जाधव यांच्यासह डॉ. प्रशांत भड यांनी सदस्य सचिव म्हणून सिंहांचा वाटा उचलला. सोबत बारा वर्षांच्या या न्यायालयीन लढ्याचे विजयात रूपांतर करण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, बैलगाडी शर्यत प्रेमी, गाडामालक-चालक, सेवाभावी संस्था यांच्यासह न्यायालयीन प्रक्रिया पार पाडणारे महाराष्ट्र शासनाचे सॉलिसिटर जनरल अॅडव्होकेट तुषार मेहता व त्यांची टीम यांनी मोलाची कामगिरी बजावली आणि राज्यातील पशुपालक शेतकरी व बैलगाडी शर्यत प्रेमी यांची बैलगाडी शर्यतीवरील बंदी उठवण्याची मागणी या निमित्ताने पूर्ण झाली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये राज्याने केलेल्या प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्यातील (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ हा वैध ठरवून राज्यामध्ये बैलगाडी शर्यतीच्या आयोजनास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सर्व बैलगाडी शर्यत प्रेमी व बैलगाडा चालक-मालक, आयोजक यांची जबाबदारी वाढली आहे. शर्यतीबाबत घालून दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून शर्यती चे आयोजन केले जाईल व एक आदर्श संपूर्ण देशासमोर ठेवला जाईल अशी अपेक्षा सर्वांचीच असणार आहे. कारण या सर्व प्रक्रियेत न्यायालयाने प्राण्यांच्या क्रुरतेकडे वारंवार लक्ष वेधले आहे. अनेक प्राणीप्रेमी संघटनांचे लक्ष राहणार आहे त्यामुळे सर्वांनीच याबाबत सजग राहून येणाऱ्या काळात चांगल्या पद्धतीने आरोग्यदायी वातावरणात शर्यतीचे आयोजन करून कुणालाही कसलीही विरोधाची संधी मिळणार नाही याची काळजी घ्यावी इतकेच.

# मुलगा गे रिलेशनशीपमध्ये; समलैंगिक संबंधावर स्पष्टच बोलले महेश मांजरेकर



:'एका काळेचे मणी' या सीरिजची सध्या सुरू आहे. सीरिजबद्दल बोलताना मांजरेकर म्हणाले की, ही एक कुटुंबासोबत पाहता येईल अशी मेजशीर अशी वेब सीरिज आहे. काळे कुटुंबाची ही गोष्ट आहे. त्यांच्या आयुष्यात आलेल्या वेगवेगळ्या लोकांमुळं काय काय घडतं, त्याचे किस्से ही सीरिज आहे. आम्ही नुसताच धागडधिंगा दाखवण्याचा प्रयत्न नाही केलाय. सीरिजमध्ये जे काही घडतं ते तुम्हालाही पटेल, तुम्हीही रिलेट करू शकता.

मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतील लोकप्रिय दिग्दर्शक महेश मांजरेकर त्यांच्या आगामी प्रोजेक्टमध्ये व्यग्र आहेत. त्यांनी निर्मिती केलेली 'एका काळेची मणी' ही वेब सीरिज नुकतीच प्रदर्शित झाली आहे. जिओ स्टुडिओजनं मराठी डिजिटल विश्वात 'एका काळेचे मणी' ही एक धमाल वेब सीरिज आणली आहे. एका चित्र-विचित्र फॅमिलीची आगळी वेगळी कहाणी आहे. या वेब सीरिजच्या निमित्तानं टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या एका मुलाखतीत मांजरेकरांनी केलेलं एक वक्तव्य चर्चेत आलं आहे. महेश मांजरेकर यांनी या सीरिजमधील समलैंगिक संबंध आणि त्याचा विषय यावर भाष्य केलंय. यावेळी ते मराठी मालिका, सिनेमा आणि सीरिज यांच्या प्रेक्षकांबद्दलही बोलले आहेत. मराठी प्रेक्षक हे नवीन विषय पाहण्यास तयार नाहीत, असं म्हटलं जातं ते साफ चुकीचं असल्याचंही ते म्हणाले.

सीरिजमध्ये समलैंगिक संबंधांवरही भाष्य करण्यात आलंय. मराठी प्रेक्षक हे पाहण्यास तयार आहे का? असा प्रश्न महेश मांजरेकरांना विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, आपणच आपल्या प्रेक्षकांना कमी लेखत असतो. आपला प्रेक्षक हे सगळं समजण्यासाठी खूप हुशार, स्मार्ट, पुरोगामी असा आहे. आपल्या आजूबाजूला काय घडतंय, हे त्यांना चांगलंच माहिती आहे. आपले प्रेक्षक यासाठी तयार नाहीत, असं म्हटलं तर ते मुर्खपणाचं ठरेल, असं मांजरेकर म्हणाले.

मला वाटतं की, आपले प्रेक्षक यासाठी तयार आहेत. आपल्या प्रेक्षकांना असा कन्टेंट पाहायचा आहे, हे खरं असलं तरी आपण यापासून लांब पळतोय. पण आज सोशल मीडियामुळं काही गोष्टी समजण्यासाठी सोप्या झाल्या आहेत. आजकाल समलैंगिक संबंधाबद्दल बोललं जातंय, स्वीकारलंही जातंय. प्रत्येक नातं स्वीकारलं पाहिजे आणि प्रत्येक नात्याचा सन्मा केला पाहिजे, असंही मांजरेकर म्हणाले.

## वनिता खरातचा नवरा काय काम करतो?

मुंबई : 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' फेम अभिनेत्री वनिता खरात तिच्या अभिनयामुळे नेहमीच चर्चेत असते. तिचे अनेक चाहते असून 'महाराष्ट्राची हास्य जत्रा'मधून तिच्या विनोदांनी, भूमिकांनी तिने महाराष्ट्राला वेड लावलं. काही महिन्यांपूर्वी वनिता तिच्या भूमिकेमुळे नाही तर तिच्या लग्नामुळे चर्चेत होती. ३ फेब्रुवारी २०२३ रोजी वनिता लग्नबंधनात अडकली. तिने बॉयफ्रेंड सुमित लोंढेसोबतत लग्न केलं. वनिताचं लग्न जमल्याचं समजल्यापासून अनेकांना तिचा नवरा कोण आहे, तो काय करतो याची उत्सुकता होती.

वनिताने नुकतंच एका मुलाखतीमध्ये तिचा पती सुमित काय काम करतो याची माहिती दिली. वनिताने एका पॉडकास्ट मुलाखतीत बोलताना सांगितलं, की अनेक चाहते ज्यावेळी भेटतात त्यावेळी फोटो काढण्यासाठी येतात. आता लग्नानंतर चाहते फोटो काढायला येतात, त्यावेळी सुमितला अतिशय आनंद, अभिमान वाटत असल्याचं ती म्हणली.

अनेक चाहत्यांमध्ये वनिताचा नवरा नेमकं काय करतो याची उत्सुकता असते. याबाबत बोलताना वनिताने सुमित अकाउंटंट असल्याचं सांगितलं. डिमार्टच्या हे ड ऑफिसमध्ये तो अकाउंटंट असल्याचं ती म्हणाली.





## खूप कमी वयात लग्न..4 वर्षाच्या मुलाची आई.. स्वप्न पहा म्हणणारी अपूर्वा राय आहे तरी कोण?





कोण आहे अपूर्वा राय? याआधी कधी हे नाव ऐकलंय? कदाचित नाहीच. पण आता या नावाभोवती चर्चेत वर्तुळ आहे तेव्हा नक्की तिच्याविषयी जाणून घेण्यास इच्छुक असाल आपण.

तर अपूर्वा खूप मोठं यश संपादन करण्याच्या इच्छेने बुल्गैरियाला रवाना झाली आहे. आता आपणही हा विचार करत असाल की असं काय खास आहे अपूर्वा रायमध्ये की आम्ही तिच्याविषयी इतकी प्रस्तावना करत आहोत.

तर अपूर्वा राय दुसरी-तिसरी कोणी नसून तिनं मिसेस साऊथ पॅसिफिक एशिया युनिव्हर्स २०२२ हा पुरस्कार पटकावला आहे. आजच्या घडीला ती मिसेस युनिव्हर्स २०२३ मध्ये सहभाग घेण्यासाठी बुल्गैरियाला रवाना झाली आहे.

दोन दिवस आधी अपूर्वा रायला मुंबई एअरपोर्टवर पाहिलं गेलं. यादरम्यान तिनं मीडियाशी बोलताना सांगितलं की ती भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी मिसेस युनिव्हर्स २०२३ या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जात आहे. हा प्लॅटफॉर्म तिच्यासाठी खूप मोठा आहे.

## शिवाली परबच्या नव्या फोटोशूटवर चाहता फिदा,थेट लग्नाची मागणी घालत म्हणाला...



छोट्या पडद्यावरील सर्वाधिक चर्चेत असलेला कार्यक्रम म्हणून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ला ओळखले जाते. या कार्यक्रमाने छोट्या पडद्यावरील लोकप्रिय शो म्हणून ओळख मिळवली आहे. या कार्यक्रमातील हास्यवीर प्रेक्षकांना खळखळवून हसवताना दिसतात. महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री शिवाली परबला एकाने लग्नाची मागणी घातली आहे. त्यामुळे ती चर्चेत आली आहे.

महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम अभिनेत्री शिवाली परब ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती कायमच तिचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करताना दिसते. नुकतंच शिवाली परबने तिचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोत तिने पिवळ्या रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. यात ती फारच सुंदर दिसत आहे.

शिवालीने हा फोटो शेअर करताना फारच चांगले कॅप्शन दिले आहे. "तकदीर मेरी अब तो तकदीर तुम्हारी है, ज़हां दिल था कभी मेरा तस्वीर तुम्हारी है" असे तिने या फोटोला कॅप्शन देताना म्हटले आहे. तिच्या या फोटोवर तिच्या अनेक चाहत्यांनी कमेंट केल्या आहेत.

तिच्या या फोटोला कमेंट करताना एका चाहत्याने तिला चक्क मागणी घातली आहे. 'लग्न करशील का माझ्या सोबत' अशी कमेंट त्या चाहत्याने केली आहे. तर अनेकांनी शिवालीच्या या फोटोवर ती खूप सुंदर दिसते, फार छान अशा विविध कमेंट केल्या आहेत.

दरम्यान शिवाली एक उत्तम अभिनेत्री आहे. हास्यजत्रेतून प्रसिद्धी मिळवलेल्या शिवालीने चित्रपटांतही काम केलं आहे. 'प्रेम प्रथा धुमशान' या चित्रपटात ती मुख्य भूमिकेत दिसली होती. या चित्रपटातील तिने दिलेल्या किसींग सीनचीही चर्चा रंगली होती.

# भारताला हरवण्यासाठी वेस्ट इंडिजची जोरदार तयारी!

## स्पर्धा अर्धवट सोडून खेळाडू माघारी

महाईन्यूज |
नवी दिल्ली| वृत्तसंस्था

**भारतात रंगणाऱ्या वनडे वर्ल्ड कपसाठी वेस्ट इंडिज संघ पात्र ठरू शकला नाही. ४८ वर्षांच्या वर्ल्ड कप इतिहासात प्रथमच त्यांच्यावर अशी नामुष्की आली. आता किमान घरच्या मैदानावरील भारताविरुद्धच्या मालिकांमध्ये (कसोटी/वनडे/टी-२०) तरी यश मिळवावे या दृष्टिने त्यांनी पावले टाकायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आव्हानच संपुष्टात आलेल्या वनडे वर्ल्ड कपची प्राथमिक फेरी अर्धवट सोडून अष्टपैलू जेसन होल्डन आणि वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफ मायदेशी परतणार आहेत.**

'जेसन होल्डर आणि अल्झारी जोसेफ आयसीसी वर्ल्ड कप प्राथमिक फेरीतील अखेरच्या दोन लढतींना मुकणार आहेत. ते मायदेशी कॅरेबियन बेटांवर परततील. भारताविरुद्धच्या आगामी मालिकांचा विचार करता त्यांच्यावरील कार्यभार कमी व्हावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे', असे वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने आपल्या ट्विटर हँडरवर नमूद केले आहे.

प्राथमिक फेरीच्या सुपर सिक्समधील बुधवारी होणाऱ्या सामन्यात विंडीजची गाठ ओमानशी पडणार आहे. तर शुक्रवारच्या लढतीत विंडीजला श्रीलंकेशी दोन हात करायचे आहेत. विंडीज दौऱ्यावर भारतीय संघ दोन कसोटींच्या मालिकेत भाग घेईल. यातील पहिली कसोटी १२ जुलैपासून डॉमिनिका येथे सुरू होईल. तर दुसऱ्या कसोटीचे आयोजन २० जुलैपासून पोर्ट



ऑफ स्पेनला होईल. या कसोटी मालिकेनंतर प्रत्येकी तीन वनडे आणि टी-२० लढतींच्या मालिका होतील.

विंडीज क्रिकेट संघाचे हित डोळ्यापुढे ठेवूनच होल्डर, जोसेफ माघारी येत असल्याचे विंडीजच्या निवड समितीचे प्रमुख डेसमंड हेनेस यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, " होल्डर, जोसेफ हे भारताविरुद्धच्या मालिकेत विंडीजचे हुकमी मोहरे ठरतील. अशा खेळाडूंना मालिकेच्याआधी विश्रांती देणे आवश्यक आहे. आपल्या आगामी मालिकांचा कार्यक्रम पाहून विंडीजने नियोजन केले असून जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या मालिकांबाबत ते अधिक गांभीर्याने विचार करत आहेत. "

### कोहली वेस्ट इंडिजमधल्या पहिल्याच सामन्यात ठरला अपयशी,

वेस्ट इंडिजमधल्या पहिल्याच सामन्यात विराट कोहली पुन्हा एकदा अपयशी ठरल्याचे पाहायला मिळाले. विराट कोहलीकडून पुन्हा एकदा तीच चूक घडल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे कोहलीला या सामन्यात फक्त तीन धावांवरच समाधान मानावे लागले. वेस्ट इंडिजमध्ये पोहोचल्यावर भारतीय संघ सरावात मग्न होता. त्यावेळी कोहलीकडून चांगला सराव झाल्याचे पाहायला मिळाले होते. कोहलीचे व्हिडिओ आणि फोटोही चांगलेच व्हायरल झाले होते. त्यामुळे वेस्ट इंडिजमधील पहिल्या सामन्यात त्याच्याकडून चांगली कामगिरी करेल, अशी चाहत्यांना आशा होती. पण वेस्ट इंडिजमधल्या पहिल्याच सामन्यात कोहली अपयशी ठरल्याचे पाहायला मिळाले. दोन दिवसीय सराव सामना वेस्ट इंडिजमध्ये सुरु झाला आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवशी कोहली फलंदाजीला उतरला होता. काही काळ कोहली खेळपट्टीवर होता, तो आता स्थिरावेल असे वाटत होते. पण यावेळी ऑफ स्टम्पच्या बाहेरचा चेंडू मारण्याचा मोह त्याला आवरता आला नाही. ऑफ स्टम्पच्या बाहेरचा चेंडू तो मारण्यासाठी गेला आणि त्याचा झेल स्लीपमध्ये उडाला. भारताचा वेगवान गोलंदाज जयदेव उनाडकटने यावेळी कोहलीला तीन धावांवर बाद केले.कोहली हा गेल्या काही दिवसांमध्ये चांगल्या फॉर्मात होता. पण विश्व अजिंक्यपद स्पर्धेत तो अपयशी ठरल्याचे पाहायला मिळाले होते. पण तो या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यात चांगली कामगिरी करेल,असा विश्वास त्याच्या चाहत्यांना आहे. पण पहिल्याच सराव सामन्यात तो अपयशी ठरला आहे. या सामन्यानंतर भारतीय संघ अजून एक सराव सामना खेळणार आहे. त्यानंतर भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला कसोटी सामना हा १२ जुलैपासून सुरु होणार आहे. त्यासाठी भारतीय संघ हे सराव सामने खेळत आहे.

# रिंकू सिंगला डावलून टीम इंडियात तिलक वर्माला संधी!

## तिलक वर्माने IPL 2023 मध्ये संघासाठी अनेकदा स्फोटक फलंदाजी केली

| नवी दिल्ली |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**भारतीय संघ सध्या वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. प्रथम दोन सामन्यांची कसोटी मालिका आणि मग ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. या दोन्ही मालिकांसाठी टीम इंडियाची घोषणा आधीच करण्यात आली होती. पण टी-२० संघाची मात्र घोषणा करण्यात आली नव्हती.**

त्यामुळे आता BCCI च्या निवड समितीने ५ जुलैला भारताच्या टी-२० संघाची घोषणा केली आहे. भारताला कसोटी आणि वनडे मालिकेनंतर वेस्ट इंडिजसोबत ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. ज्याचे नेतृत्त्व हार्दिक पांड्या करणार आहे. खरं तर, बीसीसीआयने आयपीएल फ्रँचायझी मुंबई इंडियन्सचा स्फोटक फलंदाज तिलक वर्माला संधी दिली आहे. कोलकाता नाईट रायडर्स स्टार रिंकू सिंगला संधी मिळेल, अशी चाहत्यांना आशा होती. पण तसे न होता रिंकू सिंगपेक्षा तिलकला संधी देण्यात आली आहे.

आयपीएल २०२३ मध्ये, रिंकू सिंग आणि तिलक वर्मा यांनी आपापल्या संघांसाठी उत्कृष्ट कामगिरी केली. रिंकूने पाच चेंडूत पाच षटकार मारले जे येणारी अनेक वर्षे सर्वांच्या स्मरणात राहतील. याशिवाय रिंकूने केकेआरला पराभूत होत असलेले अनेक सामने जिंकवले देखील आहेत. मात्र त्यानंतरही बीसीसीआयने वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी रिंकूकडे दुर्लक्ष करत त्याच्या जागी तिलक वर्माला संधी दिली आहे.

रिंकू सिंगने IPL 2023 मध्ये स्फोटक फलंदाजी केली आणि संघाला पराभूत असलेले सामने जिंकवून दिले. रिंकूने आयपीएल २०२३ मधील सर्व सामने कोलकातासाठी खेळले. त्याने १४ सामन्यात ५९.२५ च्या सरासरीने आणि १४९.५२ च्या स्ट्राईक रेटने ४७४ धावा केल्या. यादरम्यान, त्याने ४ अर्धशतके ठोकली आहेत आणि ६७ धावसंख्या त्याची नाबाद सर्वोत्तम धावसंख्या देखील आहे. याशिवाय त्याने शेवटच्या पाच चेंडूत पाच षटकार मारून गुजरातविरुद्धचा सामना जिंकला. कारण शेवटच्या पाच चेंडूंमध्ये संघाला २८ धावांची गरज होती.

मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज तिलक वर्माने IPL 2023 मध्ये संघासाठी अनेकदा स्फोटक फलंदाजी केली आहे. मात्र, संघाने त्याला तीन सामन्यांत विश्रांतीही दिली. त्याने आयपीएल २०२३ मध्ये ११ सामन्यांमध्ये ४२.८८ च्या सरासरीने आणि १६४.११ च्या स्ट्राइक रेटने ३४३ धावा केल्या.

